The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत एकनाथ यांचे वाङ्‌ममयीन कार्य

**प्रा.डॉ. आर. एस. बडुरे**
सहयोगी प्राध्यापक श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना :**

संत ज्ञानेश्वर माऊलीनंतर तीनशे वर्षांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. महाराष्ट्रात भागवत धर्माची ध्वजा फडकवत ठेवण्याचे कार्य सोळाव्या शतकात संत एकनाथांनी केले. संत एकनाथांचा जन्म पैठण येथे इ.स. 1528 (शके 1450) साली पुण्यपावन अशा घराण्यात झाला. ज्यांनी विजयनगरहून पंढरपुरास विठ्ठलाची मूर्ती परत आणली त्या सुप्रसिद्ध संत भानुदासांचे एकनाथ हे पणतू होते. संत एकनाथ यांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते तर आईचे नाव रुक्मिणी होते. संत एकनाथांना आई-वडिलांचा सहवास फार काळ लाभला नाही. आई-वडिलांच्या निधनानंतर संत एकनाथांचे पालन पोषण त्यांच्या आजी आजोबांनी केले. संत एकनाथांना देवपूजा आणि रामनामाचा जप याची विलक्षण आवड होती. संत एकनाथांनी दत्ताचे उपासक व देवगिरी राज्याचे कारभारी जनार्दनस्वामी या अधिकारी पुरुषाकडून गुरुदिक्षा घेतली. संत एकनाथांनी अनेक धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केला व त्याचबरोबर तीर्थयात्राही केली. संत एकनाथांनी तीर्थयात्रा करीत असताना त्यांनी तत्कालीन समाजाचाही अभ्यास केला.

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना करून 'वारकरी' हा संप्रदाय समाजात उजवीला. परंतु त्याचा खोलवर परिणाम दिसून येण्यापूर्वीच देवगिरीच्या यादवांचे राज्य लयास गेले. एखादा संप्रदाय लोकांना कितीही आवडला तरी तो दीर्घकाळ टिकविण्यासाठी समाजात तो सतत मुरत राहावा लागतो. पुढच्या काळात संत नामदेवांनी प्रचार केला होता; पण ज्ञानेश्वर, नामदेवांच्या नंतर या पंथाचा प्रचार नि प्रसार मंदावला तेराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत वाडमयाला थोडा संथपणा आला. प्रथम संत एकनाथांनी आणि नंतर संत तुकारामांनी या स्थितीत बदल केला. वाङ्‌ममयात आणि संस्कृतीत त्यांच्या कार्याने नवे चैतन्य आले. प्रस्तुत शोधनिबंधात संत एकनाथांच्या वाङ्‌ममयीन कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**संत एकनाथांचे वाङ्‌ममयीन कार्य :**

संत एकनाथांची वाडमयीन सेवा ही बहुविध आहे. त्यात टीका, कथा ग्रंथ, आख्याने, आध्यात्मिक, प्रकरणे, अभंग, पदे, गवळण व भारुडे इत्यादींचा अंतर्भाव होतो. त्याची एकूण संख्या 75000 ओव्या इतकी भरते. ओवीबद्ध ग्रंथाची ओवी संख्या साठ हजारावर आहे. एकनाथांची विद्‌वत्ता आणि लोकहिताची कळवळ यासर्व गोष्टींचे दर्शन त्यांच्या वाङ्‌ममयातून होते. संत एकनाथांचे

व्यक्तिमत्त्व म्हणजे अष्टपैलू होते. त्यांनी विविधतापूर्ण अशी वाडमय निर्मिती केली. साहित्यातून अध्यात्म, जनजागृती, समाज दर्शन घडविले. केवळ शांत आणि भक्ती या रसाचे साम्राज्य असणाऱ्या मराठी साहित्यात आता शृंगार, वीर आणि हास्य या रसांनाही मान्यता मिळाली. संस्कृतातील तत्त्वज्ञान यापूर्वी जाणीवपूर्वक मराठीत आले असले तरी मराठीतील ग्रंथरचनेला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली ती संत एकनाथांनी.

संत एकनाथांनी 'चतु श्लोकी भागवत', 'रुक्मिणीस्वयंवर', 'भावार्थ रामायण', 'स्फूट प्रकरणे', 'पदे', 'गौळणी', 'भारुडे' अशा वेगवेगळ्या प्रकारच्या रचना केल्या. त्यांनी आपले विचार व्यक्त करण्यासाठी विविध पद्धतीची योजना केली. पंडित आणि विद्वानासाठी 'चतु: श्लोकी भागवत' आणि 'एकनाथी भागवत' चे लेखन केले. मध्यमवर्गीयासाठी 'रुक्मिणीस्वयंवर' आणि 'भावार्थ रामायणाची' योजना केली आणि समाजातील सर्वसामान्य असा जो तळाचा वर्ग होता त्यासाठी 'भारुडांची' निर्मिती केली. संत ज्ञानेश्वरांच्याच शिकवणीला उजाळा देऊन या विविध मार्गांनी उच्च वर्गीयापासून ते कनिष्ठ वर्गापर्यंत ते पोहोचविण्याचे फार महत्त्वाचे कार्य संत एकनाथांनी केले. ग्रंथातील तत्त्वज्ञान लोकभाषेत सांगून समाजाला मनोरंजन करीत करीत लोकशिक्षण देणारे संत एकनाथ हे पहिले कवी होते.

**1) चतु: श्लोकी भागवत :**

संत एकनाथांचा 'चतु: श्लोकी' भागवत हा पहिलाच ग्रंथ होय. श्री गुरुजनार्दन स्वामींच्या आज्ञेवरून पंचवटी येथे हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात विश्व उत्पतीसारखा अवघड विषय सोपा करून नाथांनी आहे. तसेच सृष्टी निर्मात्या ब्रह्मदेवाला जेव्हा आपण हे कार्य कसे केले यासंबंधी संभ्रम निर्माण होतो त्यावेळी भगवंतानी त्यांचे केलेले शंका निरसन, ब्रह्मदेवांनी केलेली तपाची व्याख्या, तपाचे महत्त्व आणि त्यातून निश्चित केलेली नाम संकीर्तन भक्तीची सुलभ वाट यातून नाथांनी तत्त्वज्ञान विशद केले. मूळ भागवतातील द्वितीय स्कंधामधील नवव्या अध्यायाच्या 32 ते 35 या चार श्लोकावर नाथांनी 1036 ओव्या लिहिल्या आहेत. हा नाथांचा पहिलाच ग्रंथ असल्याने नाथ येथे विनयाने आणि संकोचाने बोलतात. "सर्वाभूती भगवद भाव हीच माझी मुख्य भक्ती" अशी भागवत संप्रदायाची शिकवण नाथांनी या ग्रंथाद्वारे सांगितली. मराठी भाषेचा यथार्थ गौरवही नाथांनी या ठिकाणी केला आहे. ग्रंथाच्या शेवटी 'जे बोलविले जनार्दने । तेचि ग्रंथ कथने कथिले म्या' असे आपल्या ग्रंथाचे श्रेय नाथांनी आपल्या गुरूला देऊन त्यांच्या चरणी अर्पण करतात.

**2) एकनाथी भागवत :**

वीस हजार ओव्यांचा नाथांचा 'एकनाथी भागवत' हा दुसरा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. चतु:श्लोकी भागवताच्या रचनेवर जनार्दनस्वामी प्रसन्न झाले आणि त्यांनी नाथांना एकादशस्कंधावर विस्तृत भाष्य लेखनाची आज्ञा केली. इ.स. 1570 ते इ.स. 1573 अशी तीन वर्षे या ग्रंथाचे लेखन चालू होते. या

ग्रंथ लेखनाची सुरुवात पैठण येथे झाली तर ग्रंथाची समाप्ती काशीक्षेत्री झाली. मूळ भागवताच्या एकादशस्कंधावरील नाथांची ही मराठी भाषेमधील ओळीबद्ध टीका आहे. ज्ञानेश्वरांनी गीतावर टीका केली आणि नाथांनी एकादशस्कंधावर टीका केली. गीतेत कृष्ण-अर्जुन संवाद आहे तर एकादशस्कंधात असाच संवाद दिसतो. ज्ञानेश्वरी 9009 ओव्यांची तर नाथ भागवतात हा ग्रंथात 18800 ओव्यांचा ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या रूपाने भागवत धर्माची ओळख एकनाथांनी करून दिली. या भागवतातून नाथांनी सर्वसामान्य लोकांसाठी भागवत संप्रदायाची तत्वे सांगितली आहेत. कथात्मकतेमुळे त्यांचे निवेदन रसाळ झाले आहे. भागवत संप्रदायात ज्ञानेश्वरी इतकाच एकनाथी भागवतास मान दिला जातो.

**3) रुक्मिणीस्वयंवर :**

संत एकनाथांचा 'रुक्मिणीस्वयंवर' हा पहिलाच आख्यानपर ग्रंथ होय. या ग्रंथाची रचना नाथांनी इ.स. 1571 मध्ये केली. मराठीत आजवर जी आख्यान काव्य झाली आहेत त्यापैकी एकाचीही बरोबरी नाथांच्या काव्याशी होऊ शकत नाही. उलट नाथांच्या रुक्मिणीस्वयंवराची उसनवारी पुढील कवींनी केलेली दिसते. भागवताच्या दशमस्कंधातील 144 श्लोकांवर नाथांनी हे अठरा अध्यायांचे व सतराशे अकरा ओव्यांचे आख्यान लिहिले. नाथांना वेदांताचे विचार बहुजन समाजाला सांगायचे होते म्हणून त्यांनी या ग्रंथाची निर्मिती केली. पहिल्या सात अध्यायात रुक्मिणीहरण, पुढील सहा अध्यायात युद्धवर्णन आणि शेवटच्या पाच अध्यायातून विवाह समारंभाचे वर्णन अशी कथेची विभागणी आहे. नाथांनी या कथानकातून वीर, शृंगार व हास्य रसांची निर्मिती केली आहे.

**4) भावार्थ रामायण :**

नाथांचा हा एक मोठा ग्रंथ आहे. त्यांनी रामकथा गायल्या आहेत. या ग्रंथात 40000 च्या वर ओव्या आहेत. हा ग्रंथ नाथ पूर्ण करू शकले नाहीत. त्यांच्या 25000 ओव्या आहेत. बाकीच्या सुमारे दहा हजार ओव्या या नाथांचा शिष्य गावबा यांच्या आहेत. या ग्रंथात रामचरित्राचे वर्णन केलेले आहे. या रामायण ग्रंथाला भावार्थ असे नामाभिधान दिले आहे त्याचे कारण असे की, संपूर्ण ग्रंथात अध्यात्माचा धागा गुंफलेला दिसतो. राम, सीता, कौशल्या, विश्वामित्र अद्वैतभक्ती किंबहुना अद्वैत सिद्धांताची आकर्षक व परिणामकारक उदाहरणे या देशकाल परिस्थितीनुसार अगदी योग्यवेळी एका विशिष्ट सामाजिक हेतूने ही रामकथा लोकांसमोर ठेवली आहे. हा हेतू राष्ट्रीय स्वरूपाचा आहे. तत्कालिन देशस्थितीचे सुक्ष्म अवलोकन नाथांनी केले आहे. समाजापुढे त्यांनी पराक्रमी, स्वाभिमानी व सहिष्णु अशा रामचंद्राचा धीरोदात्त आदर्श ठेवला. नाथांचा श्रीराम हा आदर्श महापुरुष आहे. त्यांच्याद्वारे त्याग, कर्तव्य, भक्ती, स्वधर्मनिष्ठा, मानवता या आदर्श जीवनमूल्यांची ओळख करून देऊन नाथांनी समाज कर्तृत्वास व राष्ट्र कर्तृत्वास प्रेरणा दिली.

**5) स्फुट रचना :**

नाथांनी बरीचशी स्फुट प्रकरणे लिहिली. 'हस्तामलक', 'शुकाष्टक', 'आनंदलहरी', 'गीतासार', 'चिरंजीवपद', 'गीतामहिमा' आदी स्फुट प्रकरणे नाथांनी लिहिली आहेत. त्याचबरोबर आख्यान रचना सुद्धा केली. विनोदी आख्याने लिहिली. भक्त चरित्र, संत चरित्रे, संत स्तुतीपरचरण अशा विविध प्रकाराचा काव्यप्रकार समृद्ध केला. ध्रुव, सुदाम, प्रल्हाद, नामदेव, गोरा कुंभार आदी संतांची चरित्रही लिहिली.

**संत एकनाथांचे कार्य :**

नाथांनी बहुविध प्रकारचे लेखन केले आहे. पदे, गौळण, अभंग, भारुडे इत्यादी स्फुट लेखन केले. समाजात प्रचलित असलेल्या भारुडातून एकाच वेळी तत्त्वविचार व लोकशिक्षण मांडले. विस्कटलेला, उसवलेला, समाजपण हरवलेला समाज पाहून त्यांचे मन दु:खी झाले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या भारुडातून दिसून येते. त्यांच्या पूर्व मराठी साहित्यात शांत, भक्ती आणि वत्सल हे तीनच रसाला प्रतिष्ठा प्राप्त होते. नाथांनी शृंगार, वीर आणि हास्य या लौकिक रसाचा वापर करून साहित्यातील एकसूत्रीपणा नष्ट केला. रचनेचे विविध प्रकार हाताळले. समृद्ध अभंग रचना केली व मराठी साहित्याची शक्ती समृद्ध केली. संत एकनाथ हे युगप्रवर्तक लेखक आहेत. तत्कालीन समाज डोळ्यापुढे ठेवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य नाथांनी केले .ईश्वर प्राप्तीचा सोपा मार्ग सांगितला. ज्ञानेश्वरानंतर मोडकळीस येऊ लागलेल्या भागवत संप्रदायाला तीनशे वर्षांनी आपल्या एकनाथी भागवताचा आधार देऊन सावरून घेतले. 'जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत' हे त्यांचे जीवित कार्य होय.

**समारोप :**

संत एकनाथांची भूमिका ही पुराणीकांची आहे. त्यांनी आपला विविध प्रकारच्या स्वतंत्र ग्रंथरतनेने मराठी साहित्याला नवे वळण घालून दिले. एका नव्या युगालाच त्यांनी प्रारंभ केला. किंबहुना नाथांनी जुन्या भागवत धर्माचे पुनर्निर्माण करून महाराष्ट्रात एक नवी जागृती निर्माण केली. कीर्तन, पुराण, प्रवचनाद्वारे सतत भागवत धर्माचा प्रचार करून वैदक लोक भाषेवर ओढावलेल्या संकटाचे निराकरण करण्याचा मार्ग त्यांनी दाखविला आणि आत्मोद्वाराबरोबरच लोकोद्धारही केला.

**संदर्भ ग्रंथ :**

1) नसिराबादकर ल. रा. : 'प्राचीन मराठी वाङ्ममयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) सरदार गं. बा : 'संत वाडमयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाङ्ममय गृह, मुंबई.
3) देशमुख उषा : 'संत काव्य संचित', माया प्रकाशन, नागपूर.
4) इनामदार हे.वि. (संपा.) : 'संत एकनाथ दर्शन' , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
5) पेंडसे शं.दा. : 'महाराष्ट्राचा भागवत धर्म', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

**संत एकनाथ यांचे वाङ्ममयीन कार्य**

**प्रा.डॉ. आर. एस. बडुरे**